नि.फौ.ख.क्र. ५३४/२१
सरकार वि. श्रध्दा
निशाणी. ४

**<u>सरकारतर्फे साक्षदार क्र. १ यांची शपथेवर सरतपासणी सुरु</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव : सौ सुशमा भागवतजी आगासे
वय : अंदाजे ३५ वर्षे,
धंदा : मजुरी
राहणार : न्यु पॅन्थरनगर, पावर हाउसजवळ, नागपूर.

**<u>सरकार पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती संगिता गोगे यांचेकडून</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. मी न्यु पैन्थरनगरमध्ये किरायाने राहते. दि. १६.१०.२०२० रोजी आरोपी श्रध्दा माझया घरी दुपारी १२.०० ते १.०० वाजताच्या दरम्यान आली होती कारण ती माझया घरमालकाच्या मुलीची मैत्रिन आहे. ती नेहमी माझया घरी यायची. घटनेच्या दिवशी तिने तिचे लग्न होणार आहे त्याकरीता माझी नथ तिला बघायची आहे असे म्हटले म्हणून मी माझी नथ तिला दाखविली. तसेच इतर सोण्याचे दागीणेही तिला दाखविले व तिच्या समक्ष तांदळाच्या डब्यात ठेवले. त्यानंतर दि. २४.१०.२०२० रोजी आम्हाला माझया दिराला मुलगी पाहाण्याकरीता जावयाचे होते तेंव्हा मी तो डबा उघडला असता ते दागीणे दिसून आले नाही. त्या डब्यामध्ये सोण्याचे दिड तोळयाचे मंगळसुत्र, ६ ग्रॅमची सोण्याची गळसोळी, ५ गॅम व ३-१/२ गॅमची सोण्याच्या दोन आंगठया, ५ गॅमचे सोण्याचे कानातले टॉप, ४ ग्रॅमची सोण्याची नथ एवढा मुद्येमाल चोरीला गेल्याचे आढळले. त्यामुळे मी पोलीस स्टेशनला गेले परंतु पोलीसांनी मला दुस-या दिवशी बोलावीले त्यामुळे मी दुस-या दिवशी जावून फिर्याद दिली. आता मला सदरील फिर्याद व प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **<u>नि.५ व ६</u>** देण्यात येत आहे. त्यानंतर माझे चोरीला गेले सर्व दागीणे मला न्यायालयातुन सुपुर्दनाम्यावर मिळाले.

**<u>उलट तपासणी आरोपीतर्फे ॲड श्री. एस.एम. माटे</u>** :

२. हे म्हणणे खरे आहे की मी प्रत्यक्षात चोरी करतांना कुणाला पाहीले

नाही. मी माझया फिर्यादीमध्ये माझया चोरीला गेलेल्या दागीण्याचे नाव सांगीतले परंतु वर्णन सांगीतले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझेकडे कोणतीही चोरी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझेकडे येत होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझेकडे येवून नथ दाखव व त्यानंतर मी तिला इतर दागीणे दाखविले असे खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की आज मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास - नाही**

श्रवणोत्तर स्विकृत

मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर
दिनांक : २२/०४/२०२२

माझे समक्ष,

स्वाक्षरी/-
(एस.बी.पवार)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर